05 DEC 2025

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

महा न्यूज & व्ह्यूज

वामाक्षी
BOUTIQUE
Hanuman Nagar, ITI-Pachgaon Road,
Front of Nimat Corner Appartment, Kolhapur.
Mob.- 9175089609

# डॉ. क्रांतीवीर मोरे यांची युवा वैज्ञानिक परिषदेसाठी निवड

**कोल्हापूर, ( महान्यूज अँड व्ह्यूज):**

हरियाणातील पंचकुला येथे येत्या ६ ते ९ डिसेंबर या कालावधीत आयोजित इंडिया इंटरनॅशनल सायन्स फेस्टिव्हल -२०२५ मधील युवा वैज्ञानिक परिषदेसाठी (यंग सायंटिस्ट कॉन्फरन्स) शिवाजी विद्यापीठाच्या रसायनशास्त्र अधिविभागातील डॉ. क्रांतीवीर मोरे यांची निवड झाली आहे.



डॉ. क्रांतिवीर मोरे सौरऊर्जा क्षेत्राच्या अनुषंगाने संशोधन करीत आहेत. त्यांनी विविध प्रकारची नॅनोसंमिश्रे तयार केली असून त्यांच्यापासून कमीत कमी तापमानामध्ये आणि अत्यल्प वेळेत सौरऊर्जा उत्पादन करणारे उपकरण बनविले आहे. यामध्ये त्यांनी कॅडमियम सल्फाइड क्वांटम डॉट, नैसर्गिक रंग, टायटॅनियम डायऑक्साईड नॅनोमुलद्रव्यांचा वापर केला आहे. हे उपकरण सुलभपणे हाताळता येते. सौरऊर्जा क्षेत्रातील संशोधनाला चालना देणाऱ्या या संशोधनामुळेच डॉ. मोरे यांची या परिषदेसाठी निवड झाली आहे. डॉ. मोरे यांचे वीसहून अधिक आंतरराष्ट्रीय शोधनिबंध प्रकाशित असून सहा राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय पेटंट त्यांच्या नावावर आहेत. नुकतेच त्यांना भारत सरकारकडून कॉपीराईटदेखील प्राप्त झाला आहे. याच वर्षी त्यांनी स्वतःची स्टार्टअप प्रशिक्षण कंपनी स्थापन केली असून विद्यापीठाच्या नवोन्मेष केंद्रात नोंदणी केली आहे.

इंडिया इंटरनॅशनल सायन्स फेस्टिव्हलचे घोषवाक्य ''आत्मनिर्भर भारतः विज्ञानातून समृद्धीकडे'' असे असून देशातील वैज्ञानिक नवप्रतिभा, सर्जनशीलता यांना एकत्र आणून आंतरविद्याशाखीय संवाद आणि ज्ञानाच्या देवाणघेवाणीला प्रोत्साहित करण्याचे उद्दिष्ट त्यामागे आहे. परिषदेत नामवंत वैज्ञानिक, नोबेल पुरस्कार विजेते तसेच प्रख्यात वैज्ञानिक उपस्थित राहून मार्गदर्शन करणार आहेत.

05 DEC 2025

लोकमत

# मेघा पानसरे यांना पुरस्कार जाहीर

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या विदेशी भाषा विभागाच्या विभागप्रमुख डॉ. मेघा पानसरे यांना रशियन भाषा आणि साहित्य क्षेत्रांतील उल्लेखनीय कार्याबद्दल 'दस्तयेव्स्की स्टार' हा प्रतिष्ठित आंतरराष्ट्रीय पुरस्कार जाहीर झाला. रशियन साहित्य जगतातील कादंबरीकार फ्योदर मिखइलोविच दस्तयेव्स्की यांचे पणतू अलेक्सी द्मित्रियेविच दस्तयेव्स्की यांनी नवी दिल्लीत हा सन्मान जाहीर केला. डॉ. पानसरे रशियन भाषा, साहित्य, भाषांतर व तुलनात्मक साहित्याच्या अभ्यासक असून, त्यांनी रशियन साहित्य मराठीत आणण्यासाठी प्रयत्न केले. रशियन भाषेतील साहित्यकृतींचे मराठी भाषांतर, संशोधनपर लेखन व नव्या पिढीसाठी त्या भाषेचा अभ्यास सोपा करण्याचे कार्य केले आहे. ल्येव तल्स्तोय यांच्या 'युद्ध आणि शांती'तील अंश, अन्तोन चेखव यांच्या कथा, इवान बूनिन यांची 'सॅनफ्रान्सिस्कोचे गृहस्थ', मराठीत आणून वाचकांसाठी उपलब्ध केल्या.



05 DEC 2025
सकाळ

# डॉ. मेघा पानसरे यांना 'दस्तयेव्स्की स्टार' पुरस्कार जाहीर



डॉ. मेघा पानसरे

कोल्हापूर, ता. ४ : येथील डॉ. मेघा पानसरे यांना रशियन भाषा आणि साहित्य क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याबद्दल 'दस्तयेव्स्की स्टार' हा प्रतिष्ठित आंतरराष्ट्रीय पुरस्कार जाहीर झाला आहे. रशियन साहित्यातील नामवंत कादंबरीकार फ्योदर मिखइलोविच दस्तयेव्स्की यांच्या परंपरेचे वारसदार असलेले त्यांचे पणतू अलेक्सी द्मित्रियेविच दस्तयेव्स्की यांनी नवी दिल्लीत हा सन्मान जाहीर केला.

डॉ. पानसरे यांनी शिवाजी विद्यापीठाच्या विदेशी भाषा विभागात सहयोगी प्राध्यापक व विभागप्रमुख म्हणून काम केले आहे. त्यांनी केलेले संशोधन, लिहिलेली पुस्तके आणि आयोजित केलेले शैक्षणिक उपक्रम हे रशिया व भारत यांच्यातील सांस्कृतिक नातेसंबंध अधिक दृढ करणारे असल्याने हा पुरस्कार दिला जात असल्याचे त्यांना दिलेल्या पत्रात म्हटले आहे.

डॉ. पानसरे या रशियन भाषा, साहित्य, भाषांतर आणि तुलनात्मक साहित्याच्या अभ्यासक असून, त्यांनी रशियन साहित्य मराठीत आणण्यासाठी सातत्याने प्रयत्न केले आहेत. रशियन भाषेतील महत्त्वाच्या साहित्यकृतींचे मराठी भाषांतर, संशोधनपर लेखन आणि नव्या पिढीसाठी रशियन भाषेचा अभ्यास सोपा करण्याचे उल्लेखनीय कार्य त्यांनी केले आहे. यापूर्वी त्यांना 'सिर्गेइ इसेनिन पुरस्कार' (२०१९), 'तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी पुरस्कार' (२०१८), 'बाळशास्त्री जांभेकर अनुवाद पुरस्कार' (२०१९), 'संघर्ष सन्मान पुरस्कार' (२०१९) आणि 'डॉ. नरेंद्र दाभोलकर कृतज्ञता सामाजिक चळवळ पुरस्कार' (२०१६) अशा अनेक सन्मानांनी गौरविण्यात आले आहे.

05 DEC 2025
तरुण भारत

# विद्यापीठाच्या परीक्षेत चार गैरप्रकार

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या ऑक्टोबर / नोव्हेंबर – २०२५ हिवाळी सत्रातील पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या परीक्षेत गुरूवारी चार गैरप्रकारांची नोंद झाली आहे. सदर परीक्षेसाठी विद्यापीठाने परीक्षेत गैरप्रकार करणाऱ्या विद्यार्थ्यांच्यावर नियंत्रण ठेवण्यासाठी भरारी पथके स्थापन केली आहेत. सदर पथकाकडून गुरूवारी कोल्हापूर १ आणि सातारा ३ अशा एकूण ४ गैरप्रकाराची प्रत्यक्ष नोंद परीक्षा प्रमाद समितीमार्फत करण्यात आलेली असून सांगली जिल्ह्यातून कोणत्याही गैरप्रकाराची नोंद परीक्षा प्रमाद समितीमार्फत करण्यात आलेली नाही. विद्यापीठाच्या परीक्षा दि. ३ नोव्हेंबरपासून सुरु झाल्या आहेत.

05 DEC 2025
तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# गोव्याची आघाडीची मल्लखांबपटू
# प्राजक्ता गावडे

शरीराला ताकद, लवचिकता व बौद्धिक उर्जा देणाऱ्या मल्लखांब या भारतातील प्राचीन खेळात आज युवा खेळाडू आकर्षित होताना दिसत आहे. प्रियोळ येथील स्वस्तिक विद्यालय हे मल्लखांबपटू घडविणारे गोव्याचे एक प्रमुख केंद्र आहे. या केंद्रात अनेक मल्लखांबपटू तयार झाले आहेत. याच केंद्रातून प्रशिक्षण घेऊन आपेव्हाळ-प्रियोळ येथील प्राजक्ता वसंत गावडे या युवा खेळाडूने राज्य व देश पातळीवर नावलौकीक प्राप्त केला आहे. तिने अनेकवेळा राष्ट्रीय पातळीवरील स्पर्धेत भाग घेतला असून सुवर्ण, रौप्य व कांस्य पदके पटकावली आहेत.



दोरी मल्लखांबवर कौशल्य दाखविताना प्राजक्ता गावडे.



चषकासह प्राजक्ता गावडे

२०२३ साली जयपूर, राजस्थान येथे झालेल्या अखिल भारतीय विद्यापीठ स्पर्धेत तिने शिवाजी विद्यापीठातर्फे खेळताना सुवर्णपदक, विशाखापटणम येथे झालेल्या दक्षिण विभागीय मल्लखांब स्पर्धेत रौप्य, २०१३ साली तामिळनाडू येथे झालेल्या दक्षिण विभागीय मल्लखांब स्पर्धेत कांस्य तसेच गोवा राज्य पातळीवरील १२ वर्षाखालील मुलींच्या स्पर्धेत सुवर्णपदक पटकावले. याशिवाय यावर्षी फेब्रुवारी महिन्यात उत्तराखंड येथे झालेल्या ३८ व्या राष्ट्रीय स्पर्धेत, २०२४ साली गुवाहाटी, आसाम येथे झालेल्या खेलो इंडिया विद्यापीठ स्पर्धेत, २०२२ साली गुजरात येथे झालेल्या ३६ व्या राष्ट्रीय स्पर्धेत तसेच २०२३ साली गोवा येथे झालेल्या ३७ व्या राष्ट्रीय स्पर्धेत तिने गोवा राज्याचे प्रतिनिधित्व केले.

२५ वर्षीय प्राजक्ताने पाचव्या इयत्तेत असताना मल्लखांब खेळाला सुरुवात केली. विद्यालयातील शारीरिक शिक्षक लक्ष्मीकांत नाईक हे विद्यार्थ्यांना या खेळात सहभागी होण्यासाठी प्रोत्साहन देत होते. त्यांच्या प्रोत्साहनामुळे अनेक मुली या खेळात प्राविण्य मिळवित होत्या. त्यांना बघून प्राजक्ताने २०११ सालापासून मल्लखांब खेळाला प्रारंभ केला. महाराष्ट्रातील प्रशिक्षक गणेश बोदाडे व सचिन चौधरी यांचे तिला प्रशिक्षण लाभले. सध्या ती प्रशिक्षक समीक्षा गावडे व प्रज्योत नाईक यांच्याकडून मार्गदर्शन घेत आहे. २०१२ सालापासून ती गोवा संघाचे प्रतिनिधित्व करीत आहे. २०१२ साली पुणे येथे झालेल्या स्पर्धेत, २०१३ पुद्दुचेरी येथे झालेल्या राष्ट्रीय स्पर्धेत, २०१४ पुणे, फोंडा गोवा येथे झालेल्या राष्ट्रीय स्पर्धेत तसेच २०१९ साली अमरावती, महाराष्ट्र येथे झालेल्या पश्चिम विभागीय खेलो इंडिया 'एक भारत श्रेष्ठ भारत' मल्लखांब स्पर्धेत तिने सहभाग घेतला. गोवा मल्लखांब संघटनेचे आश्रयदाते मंत्री सुदिन ढवळीकर, अध्यक्ष मिथिल ढवळीकर, अखिल भारतीय मल्लखांब फेडरेशनचे सचिव नारायण कुराडे व प्रशिक्षक समीक्षा गावडे यांची आपल्याला सदैव मदत लाभल्याचे ती सांगते. खेळात सहभागी होण्यासाठी कुटुंबीयांचा तिला पाठिंबा मिळत आहे.







मल्लखांबवर संतुलन राखताना प्राजक्ता गावडे.

**शिक्षणातही उच्च पदवी**

मल्लखांब खेळात बहुमूल्य योगदान देतानाच प्राजक्ताने शिक्षणातही उत्तम कामगिरी करून वाणिज्य शाखेत पदव्युत्तर पदवी मिळवली आहे. दहावीपर्यंतचे शिक्षण तिने प्रियोळ येथील स्वस्तिक विद्यालयातून घेतले. बारावी परीक्षा कुर्टी फोंडा येथील कामाक्षी उच्च माध्यमिक विद्यालयातून ती उत्तीर्ण झाली. फर्मागुडी फोंडा येथील जीव्हीएम गोविंद गोपाळ पै रायतूरकर वाणिज्य महाविद्यालयातून बी.कॉम झाल्यानंतर याच महाविद्यालयातून ती एम. कॉम. परीक्षा उत्तीर्ण झाली आहे. सध्या ती कुंडई येथील अर्काजा टेक्नॉलॉजिस या आस्थापनात अकाऊंट असिस्टंट म्हणून काम करीत आहे.

'मल्लखांब' खेळ हा कुस्ती, जिम्नॅस्टिक व योग यांचे मिश्रण आहे. व्यायामाव्यतिरिक्त हा खेळ आपल्यात अनेक सकारात्मक बदल घडवू शकतो. शारीरिक फायद्याबरोबरच ताकद, लवचिकता, संतुलन व समन्वय साधता येतो. युवा खेळाडूंनी या खेळात यावे व आपली प्रगती साधावी यासाठी आपण प्रयत्न करणार असल्याचे ती सांगते. भविष्यात ती मल्लखांब खेळाची प्रशिक्षक होणार असून पंच म्हणून कामगिरी करण्याचा तिचा मानस आहे. यासाठी पंच परीक्षा देण्यासाठी ती तयारी करणार आहे.

- नरेश कृष्णा गावणेकर